[वेळ: ३ तास] [ गुण:१००]

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात

प्र. १ अ) मानवी भाषेचे स्वरूप विशेष सोदाहरण स्पष्ट करा. २०

किंवा

आ) मानवी भाषेच्या विविध कार्याचा आढावा घ्या.

प्र.२ अ) भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत सोदाहरण स्पष्ट करा. २०

किंवा

आ) जागतिकीकरणाचे भाषिक, सांस्कृतिक विविधतेवर होणारे परिणाम विशद करा.

प्र.३ अ) प्रमाण भाषा ही संकल्पना स्पष्ट करून, प्रमाण भाषेच्या वापर क्षेत्रांचा आढावा घ्या. २०

किंवा

आ) बोली म्हणजे काय ते सांगून बोलीच्या अभ्यासातील क्षेत्रीय कार्याचे महत्व स्पष्ट करा.

प्र.४ खालीलपैकी प्रत्येक गटातील प्रत्येकी एक टीप लिहा ३०

| (अ) गट | (ब) गट | (क) गट |
|---|---|---|
| १) मानवी भाषेची सामाजिकता | १) भाषेचा बहुजिनसिपणा | १)बोलींच्या अभ्यासाची साधने |
| २) भाषेचे परिणामनिष्ठ कार्य | २) भाषा विकासाचे निकष | २)बोलींच्या जतन,संवर्धनाचे प्रयत्न |

प्र.५ खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. १०

१) मानवी भाषेची कोणतीही एक व्याख्या लिहा.
२) रोमन याकोबसनने कोणते नमुनारूप मांडले आहे.
३) सपीर आणि वोर्फ यांनी कोणता सिद्धांत मांडला.
४) भाषिक ध्रुवीकरण म्हणजे काय?
५) भाषा नियोजन म्हणजे काय?
६) भाषाद्वित्व म्हणजे काय?
७) लघुक्षेत्रीय भाषा कोणत्या?
८) मराठीच्या कोणत्याही दोन बोली सांगा
९) मालवणी बोली कोणत्या जिल्हांमध्ये बोलली जाते.

---